## के. के. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षांच्या अनुषंगाने जागतिक महिला दिना अंतर्गत के. के. वाघ कृषि महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार दि. ८ मार्च, २०१९ रोजी मा. सौ. पल्लवी कदम, वरिष्ठ तुरुंग अधिकारी, मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड यांचे मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

सदर व्याख्यान डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, के. के. वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक येथे दुपारी ०३:३० ते ०५:३० वाजता सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते.

प्रारंभी प्रमुख पाहुणे मा. सौ. पल्लवी कदम, वरिष्ठ तुरुंग अधिकारी, मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड यांचा प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे यांनी शाल, पुष्पगुच्छ व रोप देऊन सत्कार केला. व्याख्यानाच्या सुरवातीला सरस्वती व कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संस्था गीत ऐकविण्यात आले.

यावेळी बोलताना मा. सौ कदम म्हणाल्या, विद्यार्थिनींनी अभ्यासाबरोबरच स्वरक्षणाचे धडे घेतले पाहिजे. तसेच मुलींनी परिस्थितीचा बाऊ न करता मनामध्ये सतत सकारात्मक विचार ठेऊन मोठी स्वप्ने बाळगली पाहिजे. समाजामध्ये मुलींकडे समानतेच्या भावनेची प्रवृत्ती वाढवली गेली पाहिजे त्याचबरोबर युवा वर्गाने देखील महिलाचा आदर सन्मान करावा असेही त्या म्हणाल्या. कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला पाहिजे व आधुनिक शेती करण्याचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. आपल्या भाषणात जिजाऊ, झाशीची राणी व किरण बेदी अश्या थोर कर्तृत्ववान स्त्रियांचे उदाहरण देऊन विद्यार्थिनीनीचे मनोबल वाढवले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य. डॉ. एस. एम. हाडोळे यांनी प्रथम सर्व विद्यार्थिनीना व महिलांना शुभेच्छ्या दिल्या व भारतीय शेतीमधील स्त्रीयांचा सहभाग किती लक्षणीय महत्वाचा आहे हे पटवून दिले.

कु. मोहिनी जगताप हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. पुष्पांजली शिंदे यांनी केला, कु. अनिता काढणे, कु. प्राची करंजीकर, कु. कोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रा. अर्चना जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब वाघ, विश्वस्थ मा. श्री चांगदेवराव होळकर, मा. श्री. समीर वाघ, सचिव प्रा के. एस. बंदी व कॅम्पस समन्वयक डॉ. वि. मा. सेवलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून कृषिमहाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



वक्त्यांचे आगमन




मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन




प्रमुख पाहुणे मा. सौ. पल्लवी कदम, वरिष्ठ तुरुंग अधिकारी, मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड यांचा प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे यांनी शाल, पुष्पगुच्छ व रोप देऊन सत्कार केला.



कार्यक्रमासाठी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी.



कार्यक्रमाच्या वक्त्या मा. सौ. पल्लवी कदम मार्गदर्शन करताना.



अध्यक्षीय भाषण करताना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे

| | |
|---|---|
|  |  |
| जागतिक महिला दिना निमित्त आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी प्रतिनिधी. | |

## बातमी